राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.

सेतू अभ्यास -उत्तर चाचणी

विषय -मराठी

इयत्ता - सातवी | एकूण गुण -२०

विद्यार्थ्याचे नाव -----------------------------------------------------------------

शाळेचे नाव -------------------------------------------------------------------

(सूचना: आवश्यकतेनुसार उत्तर लेखनासाठी पुरवणी कागद/ वही वापरावी.)

प्र. १ खालील उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही.

खाशाबांचे आजोबा उत्तम कुस्तीपटू होते तर वडिलांनीही तरुणपणात आखाड्यातील कुस्त्या गाजवल्या होत्या. वडिलांच्या तालमीत खाशाबांच्या कुस्तीचा श्रीगणेशा झाला आणि त्याचे नाते मातीशी जुळले. प्रतिस्पर्धी मल्लास चित करसे करायचे, मान कशी पकडायची, पट कसा काढायचा याचे धडे खाशाबांनी वडिलांकडून आत्मसात केले. त्याकाळी गावागावात उरूस भरायचे. या उरुसात, जत्रेत, आखाडे भरत. खाशाबांनी वयाच्या आठव्या वर्षी पहिल्यांदा जत्रेतील कुस्ती जिंकली होती.

अ) खाशाबांनी कुस्तीचे धडे कोणाकडून आत्मसात केले? गुण - १

-----------------------------------------------------------------------------------------

ब) या उताऱ्यात कुस्तीतील कोणकोणत्या कौशल्यांचा उल्लेख केला आहे? गुण - २

क) खाशाबांच्या कुटूंबात कुस्तीची परंपरा होती, हे कशावरून समजते ? गुण - २

प्र. २ खालील कविताच्या ओळींचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही.

आता उजाडेल !

खिन्न आंधळा अंधार
आता ओसरेल पार
लहरींत किरणांची कलाबूत मोहरेल
आता उजाडेल !

शुभ्र आनंदाच्या लाटा
गात फुटतील आतां
मृदू गळ्यांत खगांच्या किलबिल पालवेल
आता उजाडेल !

अ) आंनदाने मृदू आवाजात कोण गाणार आहे? गुण- १

ब) उजाडल्यामुळे निसर्गात कोणकोणत्या घटना घडतील असे कवीला वाटते? गुण - २

---

क) 'आता पाऊस पडेल' नंतर निसर्गात होणारा बदल तुझ्या शब्दात लिही. गुण - २

---

प्र. ३ दिलेल्या सूचनेप्रमाणे कर.

अ ) खालील रिकाम्या जागी योग्य सर्वनाम लिहून अर्थपूर्ण वाक्य तयार कर. गुण - १

मैदानावर .............पतंग घेऊन गेलो. (तू, आम्ही, तो)

ब ) खालील शब्दांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण वाक्य बनव व यातील कर्ता लिही. गुण - १

आणला काल होता सविताने डबा.

क ) खालील वाक्यात क्रियापदाचे अपूर्ण भूतकाळी रूप घाल. गुण - १

वैभवी कालच्या नाटकात उत्तम अभिनय .............( करणे.)

ड) योग्य सार्वनामिक विशेषण वापरून वाक्य पुन्हा लिही. गुण - १

गुरुजी म्हणाले, "..............कचरा जास्त ................प्रदूषण जास्त."

ई) खालील शब्दांचे विरुद्ध अर्थाचे शब्द लिही. गुण- १

१) खाली - २)उद्योगी -

प्र.४ अ) खालील विषयांपैकी एका विषयावर पाच ते सहा ओळी माहिती लिही. गुण - ३

१) माझा दिनक्रम २)फुलांचा राजा

ब) आपल्या शिक्षकास पत्र लिहितांना, पत्राच्या सुरुवातीला व शेवटी लिहावयाचा मायना लिही. गुण - २